MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

मराठा समाज बांधवानी बीड जिल्ह्यात शांतता रॅली काढण्यास केलेल्या मागणीनुसार जिल्हा पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारली असल्याची अफवा पसरवून जाणीवपूर्वक काहीजण तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. ही बातमी पूर्णपणे चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी आहे. वस्तुतः जिल्हा पोलीस प्रशासनाने रॅलीला परवानगी नाकारण्याचे कोणतेही कारण नाही. रॅली होईल व नेहमीप्रमाणे माझ्या बीड जिल्ह्यातील समाजबांधव अत्यंत शांततापूर्ण मार्गाने रॅली पूर्ण करतील असा मला विश्वास आहे. मी स्वतः मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी १९९८ सालापासून आपली भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडून समाजाच्या आरक्षण मागणीला पाठिंबा दिलेला आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२८७ | बुधवार दि.१० जुलै २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -287 | WEDNESDAY DT. 10 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# राजकमल कंट्रक्शनचा जिल्ह्यातील कोट्यावधी रुपयाच्या कामात काळाबाजार?

## आमदारासह वेगवेगळ्या अधिकारीशी संगनमत?






बीड ।प्रतिनिधी

में राजकमल कंट्रक्शन यांनी बीड जिल्ह्यामध्ये केलेल्या अनेक प्रकरणांमध्ये रोड नाली रस्ते वेगवेगळ्या कामांमध्ये मात्र नंगानात चालू केला आहे वेगवेगळ्या खात्याअंतर्गत निधी आणून नेते कार्यकर्ते तुपाशी आणि बीड जिल्ह्यातील जनता उपाशी म्हटल्यासारखी गत आज पाहायला मिळत आहे यामध्ये केंद्र व राज्य शासनाने पाठवता निधी आणल्याच्या नंतर मात्र यावेळी फक्त गुत्तेदार नेते आणि वेगवेगळ्या कार्यालयातील बीड जिल्ह्यातील अधिकारी मात्र पाची बोटं तुपात म्हणण्यापेक्षा काही वेगळे नाही तर महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास यंत्रणा यांच्या मार्फत बीड जिल्ह्यात झालेल्या कामात मोठ्या प्रमाणात काळाबाजार करण्यात आलेलाआहे. झालेल्या कामांचे पुनरपरीक्षण करत तत्काळ दुरुस्ती करत कार्यकारी अभियंता अनिल सगर यांची चौकशी करत मे राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीला काळी यादीत टाकण्याची

मागणीसाठी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास यंत्रणा कार्यालयाच्या समोर जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आलेआहे. या आंदोलनाने सर्व सामान्य लोकांचे लक्ष वेधलेअसून . सदरील या योजनेतून बोगस रस्ते आणि दर्जाहीन कामे करून कोट्यावधी रूपाचा लादण्याचा प्रयत्न केला आहे.त्यामुळेमहाराष्ट्र ग्रामीण रस्ते कार्यालयाचा कार्यकारी अभियंता अनिल सगर स्वतःला जिल्हाधिकारी असल्यासारखे वागवत आहे. त्यामुळे अनिल सगर ला जोडे मारो आंदोलनाने तुमचे कान उघडतील का? असा सवल यावेळी केला जात आहे. राजकमल कन्ट्रक्शनचा मालक आणि अनिल सगर यांच्या संगनमताने योजनेतील

पैसा गेला कोठे? याची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी मनसेकडून केला जात आहे.मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात कोट्यावधी रुपयांची कामे झालेली आहेत. या कामात प्रचंड अनियमितता आहे. याबाबत महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने मुख्य कार्यकारीअभियंता अनिल सगर यांच्याकडे चौकशी करण्याची मागणी करण्यात आलेली होती. याची दखल न घेतल्याने महाराष्ट्र निर्माण सेनेच्या महिला आघाडीच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली आज दिनांक १० जुलै रोजी महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास यंत्रणेच्या कार्यालयासमोर जागरण गोंधळ

आंदोलन करण्यात आला. यावेळी अनिल सगर यांची चौकशी व में राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीने केलेल्या सर्व कामांची तपासणी करत गुन्हे दाखल करण्यात येण्याची मागणी मनसेकडून करण्यात आली. या जागरण गोंधळ आंदोलनात महाराष्ट्र निर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे मनसे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे, सहकार सेना अध्यक्ष अशोक सुरवसे, शहराध्यक्ष करण लोंढे जिल्हा सचिव सोमेश कदम जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव भाऊ बिडये महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे, अनिता घुले, यांच्यासह महिला आघाडीच्या कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थिती होती .

### थोडक्यात

- राजकमल कन्ट्रक्शन मार्फत केलेल्या कोट्यावधी रुपयांच्या कामाची चौकशी होणे गरजेचे?
- राजकमल कन्ट्रक्शनची चौकशी करा मनसेचे महाराष्ट्र ग्रामीण रस्ते कार्यालयासमोर जागरण गोंधळ
- सर्वात जास्त गेवराई तालुक्यामध्ये राजकमल कंट्रक्शन चा गेवराई मतदार संघामध्ये भ्रष्टाचाराचा नंगानाच वाचा पुढील अंकात.
- मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत कोट्यावधी रूपयांचा संगमत करून अधिकारी गुत्तेदारांनी कामात काळाबाजार?
- मनसेचे जोडे मारो आंदोलनाने भ्रष्टाचारी कोणा कोणाचे संगणमत व संगनमताने कोट्यावधी रूपयांचा भ्रष्टाचार?
- राजकमलच्या मालकासोबत कोण कोणते अधिकारी नेतेमंडळी यांच्या बैठका कोठे होतात?
- सार्वजनिक बांधकाम विभागात राजकमल कंट्रक्शन चा मोठा दरारा लवकरच राजकमल कंट्रक्शनच्या रुपयाचा कामाचा भ्रष्टाचाराचा राक्षस जनतेसमोर आणणार?

## अनिलदादा जगताप यांच्या विनंतीचा शिक्षण विभागाने राखला मान!

### संघर्षयोद्धा शांतता रॅलीनिमित्त आज सर्व शाळांना सुट्टी

बीड, प्रतिनिधी– सकल मराठा समाजाच्या वतीने आज गुरुवार दि. ११ जुलै २०२४ रोजी बीड शहरामध्ये मराठा आरक्षण योद्धा मा. मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्व मार्गदर्शनाखाली भव्य दिव्य स्वरूपात 'संघर्षयोद्धा शांतता रॅली' चे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली उद्या सकाळी ११.०० वाजताच्या दरम्यान निघणार असून जिल्ह्याभरातून मराठा बांधव, महिला भगिनीं या मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

त्यामुळे साहजिकच बीड शहरातील सर्व रस्ते सकाळी १०.०० वा ते सायंकाळी ०६ वा. पर्यंत बंद राहतील अशी परिस्थिती आहे. रॅलीच्या दरम्यान होणाऱ्या गर्दीमुळे शाळकरी मुलांची गैरसोय होऊ नये म्हणून मराठा सेवक मा. अनिलदादा जगताप यांनी शिक्षणाधिकारी प्राथमिक /माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना



शालेय विद्यार्थ्यांना एकदिवसयीय सुट्टी जाहीर करावी असा विनंती अर्ज केला होता. अनिलदादा जगताप यांच्या विनंतीचा मान राखत शिक्षणाधिकारी प्राथमिक /माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी दि. ११ जुलै २०२४ रोजी सर्व शाळांना सुट्टी जाहीर केल्याचे पत्रक प्रसिद्ध केले आहे. बीड शिक्षण विभागाच्या या सहकार्याबद्दल मराठा सेवक अनिलदादा जगताप यांनी आभार मानले आहेत.

## घोडका राजुरीजवळील पुलाचे काम गतीने पूर्णत्वास जाणार

### राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागरांनी केली कामाची पाहणी

बीड (प्रतिनिधी)

बीड ते परळी महामार्गावरील घोडका राजुरी परिसरात (ता.बीड) तलावाजवळ पुलाचे बांधकाम सुरू आहे. या रस्त्याच्या कामासह पुलाची पाहणी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.९) केली. पावसात पर्यायी रस्ता वाहून जाऊ शकतो, त्यामुळे पुलाचे बांधकाम गतीने पूर्ण करावे, अशा सूचना त्यांनी संबंधित कंपनीला दिल्या. त्यानंतर पुलाचे बांधकाम प्राधान्याने पूर्ण करून देण्याची ग्वाही राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अभियंत्यांसह कंपनीच्या व्यवस्थापकांनी दिली आहे.

पहिल्याच पावसात पर्यायी पुल वाहून गेल्याचे प्रकार जिल्ह्यात काही ठिकाणी समोर आले आहेत. याच पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड तालुक्यातील घोडका राजुरी परिसरातील पुलाच्या बांधकामाची पाहणी केली. हे काम गतीने पूर्ण न झाल्यास तलावालगतच करण्यात आलेला पर्यायी रस्ता वाहून जाण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. असे झाल्यास वाहतूक विस्कळीत होऊन बीड व परळी भागाचा संपर्क तुटू शकतो, त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग विभागाने दक्षता घेण्याची गरज आहे, अशा सूचना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केल्या. त्यानंतर



राष्ट्रीय महामार्गचे बीड विभागाचे उपअभियंता राजेंद्र भोपळे, व्यवस्थापक विनोद करडमोल यांनी प्राधान्याने पुलाचे बांधकाम पूर्ण करून त्या भागातून वाहतूक व्यवस्था सुरळीत करून देण्याची ग्वाही दिली आहे. यावेळी नाळवंडीचे सरपंच ड.राजेंद्र राऊत यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.



## आषाढी कार्तिक विसरू नका मज ! सांगतसे गुज पांडुरंग !

बीड /प्रतिनिधी

गेली शेकडो वर्षापासून श्री क्षेत्र नारायणगडाची पंढरपूर आषाढी वारीची परंपरा आजही मोठ्या उत्साहात जतन केली आहे. श्री. क्षेत्र नारायणगडाचे महंत प्रेममूर्ती ह.भ.प. शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली नारयणगड येथून हजारो वारकऱ्यांसह दिंडीचे परवा पंढरपुरकडे प्रस्थान झाले. भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी वैद्यकिन्ही येथे दिंडीचे स्वागत करून महाराजांचे आशीर्वाद घेतले. भरपूर पाऊस, उत्तम पिक पाणी आणि बळीराजाला सुख लाभूदे असे साकडे पांडुरंगाला घालून दिंडीला निरोप दिला.

पंढरीची वारी हा पृथ्वीतलावरील अभूतपूर्व सोहळा म्हणजे कल्याण, आत्मिक उद्धार, ईश्वर प्राप्ती आणि समतेचा संदेश देणारी वारी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून रामकृष्ण हरीचा जयघोष करत पंढरीच्या दिशेने धावणाऱ्या वारकऱ्यांसाठी आषाढी वारी म्हणजे पांडुरंगानेच वारकऱ्यांना घातलेली साद होय. कोणतेही निमंत्रन नसताना लाखोच्या संखेने विठ्ठल भक्त एकत्र येऊन, हरिनामाच्या गजरात गुण्या गोविंदाने पायी वाटचाल करत असतात. आपसातील आपपर भाव विसरून सकल जन समुदायाच्या कल्याणासाठी पांडुरंगाला प्रार्थना करणारा हा सात्विक सोहळा सर्व सामान्य ईश्वर भक्तांना प्रेरणा आणि बळ देणारा आहे. अध्यात्म, संस्कार आणि भक्तीचा संदेश देण्याचे अखंड काम श्री क्षेत्र नारयणगड येथे अविरतपणे चालू आहे. महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून श्री क्षेत्र नारायणगडाचा मला अभिमान आहे. असे भाव उद्गार राजेंद्र मस्के यांनी पंढरपूर वारीसाठी जाणाऱ्या भाविक भक्तासमोर व्यक्त केले.

# त्वरिता देवी ट्रस्टच्या बेजबाबदारपणामुळे चक्क डोंगरावरच अतिक्रमन

## प्रशासक लागू करण्याची भक्तगणाची मागणी

तलवाडा ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील भक्तगणांच आराध्य दैवत त्वरिता देवी गडावर पुजाऱ्याने अतिक्रमणे केलेले असतानाही अतिक्रमणे विश्वस्त मंडळ पाडत असताना त्याला पुजाऱ्यांनी मनाई हुकुम न्यायालयाकडून आणला असताना आज गडावर भव्य दिव्य बांधकामे करत असताना खाण्यापिण्याला लालची बनलेल्या विश्वस्त मंडळामुळे हा सर्व प्रकार सुरू असून या ठिकाणी गडाचा विकास खुंठला तर ब दर्जा प्राप्त झालेला असताना व कोट्यवधी रुपये मंडळाच्या खात्यावर जमा असताना विकासाची काम न करता मलिदा लाटणारे या वंशपरंपरागत विश्वस्त मंडळाच्या मनमानी कारभार व खाती पिती पार्टी मुळे या ठिकाणी विकासाच्या कामाकडे दुर्लक्ष करत मोक्याच्या ठिकाणी पुजार्यांनी भव्य दिव्य दुकाने बांधलेले असताना त्याला कसल्याच प्रकारचा विरोध न करता आज रोजी याच डोंगर माथ्यावर भव्यदिवे कामे सुरू असताना सहा महिने झाले तरी ती कामे रोखण्यात विश्वस्त मंडळाला अपयश आल्याने गावकऱ्या तीव्र संताप व्यक्त होत असून या भ्रष्ट आणि लाचार विश्वस्त मंडळांनी पायउतार व्हावे अशी मागणी होत असून याकडे धर्मदाय आयुक्तांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे .

भक्तगणाचे आराध्य दैवत व नवसाला पावणारी देवी म्हणून त्वरिता सर्वत्र परिचित असताना या गडाला शासनाने ब दर्जा मिळालेला असतानाही व देवीच्या आर्थिक बाबतीत कोट्यावधी रुपये या ठिकाणी अनेक वर्षापासून जमा आहेत व सोने-चांदी आणि हे तर मात्र या ठिकाणच्या विश्वस्त मंडळाला माहीत आहे त्याच्यात चाललय तरी काय ..? असा प्रश्न नागरिकात निर्माण होत असताना या गडावरील पुजारी यांनी मागील काही वर्षापासून भव्य दिव्य अशा दुकाना बांधल्या होत्या ते काढण्याचा प्रयत्न करण्यात आलेला असताना संबंधितांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले व न्यायालयाने त्यांना तात्पुरता मनाई आदेश दिलेला असताना त्याला जवळपास दोन वर्षे झाली असतानाही आजपर्यंत काहीच कारवाई नाही.

अतिक्रमण काढण्यासाठी दोन वर्षे उलटून गेलेले असताना पुन्हा नव्यानेच या गडाचा विकास सोडा या ठिकाणी शासनाचा मोठा भव्यदिव्य निधी असताना सोने चांदी व कोट्यावधी रुपये देवीच्या विश्वस्त मंडळाकडे जमा असताना कसल्याच प्रकारच्या सोयी सुविधा भक्त गणना मिळत नाहीत व विकासापासून कोस दूर हे जनतेचे आराध्य दैवत दूर आहे.

देवीच्या मुख्य दरवाज्या पासून ते भक्तगणांना येण्या-



जाण्याच्या जागेवर जवळपास ५०० मीटरवर पुजाऱ्यांनी भव्य दिव्य दुकाने बांधले आहेत व ते तसेच असताना अजून नवीन या ठिकाणी बांधकाम सुरू आहे कसल्याच प्रकारचा विरोध या ठिकाणचे विश्वस्त मंडळ संबंधित पुजाऱ्यांना करत नसल्यामुळे आज रोजी सहन जागेवर मोठ-मोठी बिल्डिंग या ठिकाणी होत आहे देवीला येणाऱ्या भक्तगणांना या ठिकाणी भक्तनिवास आधी ठिकाणी होणे जरुरत असताना या मंगल कार्यालयाची इमारती या ठिकाणी निर्माण होणे असताना त्याकडे दुर्लक्ष विश्वस्त मंडळ करत आहे.

दोन वर्षापासून या गडावर पुजारांनी भव्यदिव्य बांधकामे सुरू केलेल्या असून आताही भव्य दिव्य बांधकाम या ठिकाणी सुरू आहेत एवढे होत असताना मात्र केवळ च्या पाई भंगलेल्या विश्वस्त मंडळाला या गडावर लक्ष देण्यास वेळ नाही फक्त देवीच्या मुलीद्यावर डोळा असून विकास कामाकड त्यांचे दुर्लक्ष असल्यामुळे पुजारी लोकांनी मोठी बांधकामे दोन वर्षापासून केलेली असताना व गेल्या सहा महिन्यापासून या ठिकाणी भव्यदिव्य गोदाम प्रमाणे बांधकामे सुरू असताना कसल्याच प्रकारची साधी तक्रार या नोटीसहि देण्याचा प्रताप या झोपलेल्या विश्वस्त मंडळांनी केलेला नाही त्यामुळे या ठिकाणी भक्तगणात या गावकऱ्यात विश्वस्त मंडळाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे हे विश्वस्त मंडळ केवळ बाटली आणि नादी लागल्याचे जनतेत बोलले जात आहे त्यामुळे विश्वस्त मंडळाचे विरोधात जनतेत तीव्र संताप व्यक्त होत आहे तर कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असताना या प्रकरणी धर्मदाय आयुक्तांनी लक्ष देऊन हे विश्वस्त वंश परंपरागत बरखास्त करावे व न्यायालयीन कामकाज या ठिकाणी सुरू करावे व मंदिरावर सुरू असलेले टोले जंग पुजाऱ्यांच्या बांधकामाला विरोध करून जी कामे बांधकामे झाली आहेत ती या ठिकाणाहून नष्ट करून समोरील जागा येणाऱ्या भक्तगणासाठी खुली करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे आहे याप्रकरणी विश्वस्त मंडळ व धर्मदायक त्यांनी लवकरच कारवाई नाही केल्यास रस्त्यावर उतरून संबंधिता विरोधात कारवाई करणार असल्याचे बोलले जात आहे.

विश्वस्त मंडळ लालसेपोटी चूप

त्वरिता देवी स्वस्त मंडळाच्या आर्थिक लालसे पोटी गडावर पुजाऱ्याकडून भव्य दिव्य बांधकामे सुरू असताना दोन वर्षापासून याकडे विश्वस्त मंडळाचे दुर्लक्ष होत असताना गेल्या वर्षभरापासून अनेक पुजार्यांनी या ठिकाणी मोठमोठे बांधकाम केले आहे तर सहा महिन्यापासून या ठिकाणी गोदाम प्रमाणे बांधकामे सुरू असताना कसल्याच प्रकारची नोटीस या तक्रार आतापर्यंत विश्वस्त मंडळानी संबंधिताला दिली नाही त्यामुळे हे सर्व बांधकामे सुरूळीत सूरूअसून याप्रकरणी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष व सचिव यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली असतांना त्यांनी संबंधित बांधकामे रोखण्यासाठी कसल्याच प्रकारची साधी नोटीस या अडथळा निर्माण केला नसल्याचे सांगितले. त्यामुळे गडावर देवीच्या विकासाऐवजी पुजाऱ्यांच्या बांधकामाचा विकास या ठिकाणी होत असून याला या ठिकाणचे नाकाम विश्वस्त मंडळच कारणीभूत असून धर्मदायक त्यांनी याप्रकरणी लक्ष देऊन संबंधित कामे तात्काळ रोखावी व भ्रष्ट आणि लाचार विश्वस्त मंडळ बरखास्त करावे असे जनतेत बोलले जात आहे.

# रमाई घरकुल आवास योजनेपासून लाभार्थ्यांना वंचित ठेवणाऱ्या सरपंच / ग्रामसेवक यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करा - बाबासाहेब आठवले

## दोन वर्षा पासून प्रस्ताव पाठवण्याचा विसर ; दलीत वस्तीच्या निधीत बोगसगिरी

तलवाडा ।प्रतिनिधी

मागास समाजातील महार,मातंग,ढोर चांभार समाजातील गरीब,आर्थिक दृष्ट्या मागास समाजाची उन्नती व्हावी त्यांचे राहणीमान उंचावावे,त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला डोक्यावर आसरा मिळावा यासाठी शनाच्यान वतीने घरकुल योजना राबवल्या जातात परंतु सरपंच आणि ग्रामसेवकांच्या उदासीनते मुळे लाभार्थ्यांना वंचित राहण्याची वेळ येते असाच प्रकार तलवाडा येथे उघडकीस असून मागील दोन वर्षा पासून रमाई अवास घरकुल योजनेचे प्रस्ताव पंचायत समिती कार्यालय कडे पाठवण्यात आले नसल्याने हक्काच्या घरापासून वंचित ठेवणाऱ्या सरपंच आणि ग्रामसेवक यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी तलवाडा येथील माजी पंचायत समिती सदस्य बाबासेहब आठवले यांनी जिल्हाधिकारी बीड, समजा कल्याण अधिकारी,गटविकास अधिकारी यांच्याकडे ९ जुलै रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

मागास समाजातील गरिबांची आर्थिक उन्नती साधावी,बेघर गरीब लाभार्थ्यांना हककचे घर मिळावे हा उद्देश शासनाचा आहे,२०२४ पर्यंत सर्वांना घरकुल मिळणार अशी घोषणा वेळोवेळी सरकारने केली होती परंतु अद्याप घरकुले मिळाली नाहीत.रमाई आवास योजना, पंतप्रधान अवास योजना यासह विविध योजनेद्वारे घरांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात येतो परंतु ग्रामीण भागातील सरपंच आणि ग्रामसेवक यांच्या उदासीनता मुळे अनेक लाभार्थी या पासून वंचित राहत असून तलवाडा याठिकाणी सन २०२२-२०२३ या वर्षात २६ लाभार्थी निवड करून प्रस्ताव पाठवण्याचे उद्दिष्ट होते ते प्रस्ताव अद्याप ही पंचायत समिती कार्यालयाकडे सादर करण्यात आले नसल्याने दलीत समाजातील लाभार्थ्यांना हककच्या घरा पासून मुकावे लागत आहे.२६ घरकुलाचे लाभार्थी निवड करून ते पंचायत समिती कडे पाठवून डीआरडी विभागाच्या परवानगी साठी जाणे आवश्यक असताना प्रस्ताव दाखल झाले नाहीत.तसेच पिएमवाय योजनेचे ही लाभार्थी अजून पुढील हप्ते वितरण करण्याच्या प्रतीक्षेत आहेत याकडे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.तसेच तलवाडा याठिकाणी दलीत वस्ती विकास योजने अंतर्गत आलेला निधी हा बोगस कामे करून हडपण्याचा प्रकार होत असून ज्यां ठिकाणी कामे झालीत त्याच ठिकाणी नवीन कामे प्रस्तावित करून अधिकारी कर्मचारी यांची दिशाभूल करून निकृष्ट दर्जाची कामे केली आहेत व दलीत समाजाच्या विकासासाठी आलेला निधी हा त्यांच्या विकासासाठी न वापरता त्यामध्ये अपहार करण्याचे काम होत आहे या प्रकरणी जिल्हाधिकारी बीड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड तसेच सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड यांच्या कडे माजी पंचायत समिती सदस्य बाबासाहेब आठवले यांनी निवेदनाद्वारे तक्रार करून या कामाची चौकशी करण्याची मागणी दिनांक ९ जुलै रोजी केली आहे.

## शासकीय वस्तीगृहात ऊसतोड कामगाराच्या

# मुलांनी प्रवेश घ्यावा: जिल्हाध्यक्ष संतोष काळे

**बीड ।प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाच्या राज्य कामगार कल्याण महामंडळातर्फे संत भगवान बाबा ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी प्रत्येक तालुक्यात एक वस्तीग्रह सुरू करण्यात आले आहे. बीड तालुक्याचे १०० विद्यार्थी क्षमता असणारे वस्तीग्रह नाळवंडी नाका, भागात पाण्याच्या टाकी शेजारी सुरू करण्यात आले आहे .त्याची विद्यार्थी नाव नोंदणी सुरू आहे. प्रवेश अर्ज प्रत्यक्षात वस्तीगृहात वाटप सुरू आहे.**



गरजूवंत विद्यार्थ्यांनी व पालकांनी प्रत्यक्षात येऊन खाली दिलेल्या कागदपत्रासह संपर्क साधावा १) ऊसतोड कामगार असल्याबाबत नोंदणी प्रमाणपत्र ग्रामसेवक/ तलाठी२) मागील वर्षाचे पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र ३)जातीचे प्रमाणपत्र ४)आधार कार्ड झेरॉक्स५) बँक पासबुक झेरॉक्स ६)मागील वर्षाचा निकाल ७)दोन फोटो. या सर्व कागदपत्रासह अर्ज कार्यालयात जमा करावा. गोरगरीब उपेक्षित वंचित विद्यार्थ्यांसाठी मोफत निवास व भोजनासह शिक्षणाची आलेली सुवर्णसंधी आहे .त्याचा जास्तीत जास्त ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी लाभ घ्यावा. असे आवाहन महाराष्ट्र राज्य ऊसतोड कामगार वाहतूक व मुकादम संघटनेचे जिल्हाध्यक्ष संतोष काळे यांनी केले आहे काही अडचण आल्यास ९६ ८९ ०८०७७४ आणि ८० ५५ ४७० ९८६ या क्रमांकावर संपर्क साधावा.



## आदिवासी कोळी जमातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र कोळी नोंदी वरुन सुलभ रित्या तात्काळ देण्यात यावे यासाठी कोळी राष्ट्रसंघ च्या वतीने निवेदन मंत्रालय मुंबई येथे देण्यात आले

मुख्यमंत्री मा.श्री एकनाथरावजी शिंदे साहेब, उप मुख्यमंत्री मा.श्री अजित दादा पवार साहेब, उप मुख्यमंत्री मा.श्री देवेंद्र फडणवीस साहेब यांना मंत्रालय टपाल द्वारे निवेदन देण्यात आले समक्ष भेट घेऊन आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव यांच्याशी आदिवासी कौशल्य विकास उद्योजकता निधी विविध योजना संदर्भात चर्चा करण्यात आली त्यावेळी छ. संभाजीनगर चे खासदार मा. संदिपान भुमरे यांच्याशी चर्चा करून आदिवासी पडताळणी समिती (छ. संभाजीनगर विभाग प्रमुख) संगीता चौहान मॅडम यांच्याशी खा. भुमरे साहेब यांनी दूरध्वनीवरून संपर्क साधुन चर्चा केली व लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावावे असे सांगितले, तुळजापूर चे आमदार मा. राणा जगजितसिंह पाटील, वरुड मोर्शी चे आमदार मा. देवेंद्र भुयार, बुलढाणा चे आमदार मा. संजय गायकवाड यांच्याशी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सुलभ रित्या देण्यात यावे या विषयावर चर्चा करून निवेदन मंत्रालय, मुंबई राष्ट्रसंघ चे संस्थापक अध्यक्ष मा. गोकुळ दादा कोळी, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.श्री बळीराजे वाघमारे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मा. हानमंत दादा जमादार, कोळी राष्ट्रसंघ चे नेते मा. जनक भाऊ तपसे, कोळी राष्ट्रसंघ चे नेते मा. रघुराम टोंपे सर यांच्या हस्ते देण्यात आले..... त्यावेळी मिडीयाच्या माध्यमातून गोकुळ दादा कोळी व बळीराजे वाघमारे यांनी संवाद साधला असता दोन वेळा राज्य शासनाने अनुसूचित जमातीची बैठक आयोजित करण्यात आलेली दोन वेळा विविध कारणे देऊन रद्द करण्यात आली जाणुन बुजून हे सर्व सामान्य गरीब समाजाची पिळवणूक करत आहेत पाचशे कि.मी अंतरावर आलेली कोळी जमातीचे शेकडो लोकांना आले तसे परत जावे लागले आम्ही सुद्धा माणसे च आहोत माणूस म्हणून प्रशासनाने आमच्याकडे बघावे आमचा अंत पाहू नका आम्ही सुद्धा मतदार आहोत हे विसरू नका असे परखड मत कोळी राष्ट्रसंघ चे प्रदेश अध्यक्ष बळीराजे वाघमारे यांनी व्यक्त केले.

# जिल्हा बँकेच्या पथकाने अरूण इंगळेंच्या घरासमोर वाजवले डफडे

## डीसीसी बँकेच्या वसुली मोहीमेची जोरदार चर्चा

बीड, प्रतिनिधी

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने थकीत बाकी असलेल्या कर्जदारांच्या विरोधात वसुलीची अनोखी मोहीम उघडली आहे. कर्ज फेडीसाठी एकरकमी योजनेच्या योजना जाहीर करूनही बाकी थकीत ठेवलेल्या कर्जदारांच्या दारात डफडे वाजवून गांधीगीरी पध्दतीने थकीत बाकी जमा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या उपक्रमाचे सर्वस्तरातून स्वागत होत असून मंगळवारी (दि.९) अरूण इंगळे यांच्या दारात डीसीसी बँकेच्या वसुली पथकाने डफडे वाजवले.

शेतकर्यांची अर्थिक जणणी असलेल्या बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शिक्षण, सहकार, कृषी अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील लोकांना कर्जाच्या माध्यमातून उद्योग-व्यवसायाला बळ दिले आहे. केज येथील अरूण इंगळे यांच्या शैक्षणिक संस्थेला २० फेब्रुवारी २०१० रोजी ३७ लाख ५० हजार रूपयांचे कर्ज दिले होते. सदरील कर्ज ३० जुन २०११ पासून थकीत आहे. ३१ मार्च २०२४ अखेर त्यांच्याकडे १ कोटी १६ लाख एवडी थकीत बाकी आहे. अकृषी थकीत कर्जाच्या वसुलीसाठी बँकेच्या वरिष्ठ अधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बँकेच्या वसुली पथकाने मोहीम उघडली आहे. सदरील पथक थकीत कर्जदारांच्या गावात अन् घरासमोर जावून वसुलीसाठी ठिय्या मांडत डफडे वाजवत आहे. मंगळवारी (दि.९) केज तालुक्यातील राजेगाव येथे जावून डीसीसी बँक पथकाने अरूण इंगळे यांच्या दारात वसुलीसाठी डफडे वाजले. त्यांच्या दारात ठीय्या मांडत बँकेचे थकीत कर्ज भरण्याचे आवाहन केले. यापुर्वी जिल्हा बँकेच्या वसुली पथकाने भाजपा नेते रमेश आडसकर, विक्रम मुंडे, रामकृष्ण बांगर, मोराळे यांच्या घरी जावून त्यांच्या दारात डफडे वाजवले आहे. आता अरूण इंगळे यांना देखील थकीत बाकी भरा म्हणत वसुली पथकाने अरूण इंगळे यांच्या दारात डफडे वाजवले.

यावेळी वसुली पथकात एस. सी. ठोंबरे, के. यु. आघाव, एस. पी. राठोड, डी. व्ही.



कुलकणी, श्रीमती एन. एम. रामटेके यांच्यासह बँकेचे अधिकारी, विविध शाखांचे व्यवस्थापक, कर्मचारी यांचा समावेश होता.

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील लाखो शेतकर्यांची अर्थिक जनणी आहे. ती टीकली तर बळीराजा टीकणार आहे. यामुळे ज्यांनी कोणी विविध संस्थांच्या नावावर कर्ज घेतले आहेत अन् ते कर्ज थकीत आहे, अशा लोकांच्या दारात डफडे वाजवले जात आहे. यात कोण कोणत्या पक्षाचा, राजकारणी की, समाजसेवक अथवा सत्ताधारी की विरोधी पक्षातला याचा विचार केला जात नाही. यामुळे थकीत कर्जदारांनी दारात डफडे वाजण्याच्या अगोदर थकीत कर्ज भरून जिल्हा बँकेला सहकार्य करावे, असे आवाहन डीसीसी बँकेच्या वतीने करण्यात आले आले.

# नाशिक जिल्ह्यातील येवला येथील दलित तरुणास मारहाण प्रकरणातील आरोपीला तात्काळ अटक करा मानवी हक्क अभियानाची मागणी

## मातंग समाजातील तरुणाला अपहरण करून जातीय द्वेषातून व जीवे मारण्याच्या हेतूने अमानुषपणे मारहाण करण्यात आली याच्या निषेधार्थ मानवी हक्क अभियानाच्या वतीने उपजिल्हाधिकारी माजलगाव यांना निवेदन देण्यात आले.....

प्रतिनिधी, सुनिल थोरात

शिव, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ यांच्या पुरोगामी महाराष्ट्राला शरमेने मान खाली घालायला लावणारी घटना नाशिक जिल्ह्यातील येवला या ठिकाणी घडलेली आहे. सदरील युवकाला आळीपाळीने लाट्या काट्याने रबरी बेल्टने तब्बल चार तास मारहाण करून सदरील घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. सदरील घटनेला पंधरा दिवस उलटल्यानंतर ट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल झालेला आहे व सदरील घटनेतील आरोपी मोकाट आहेत त्यांना अद्यापही अटक झालेली नाही सदर प्रकरणातील आरोपीला तात्काळ अटक करून ट्रॉसिटी कायद्याअंतर्गत हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टामध्ये चालवून आरोपीला कठोर शासन करण्यात यावे जेणेकरून अशा



प्रकारच्या घटना घडणार नाहीत व पीडित प्रसाद खैरनार या मातंग समाजातील तरुणाला न्याय मिळेल व ताबडतोब त्याच्या कुटुंबाला सामाजिक न्याय मार्फत मिळणारी शासकीय मदत तात्काळ देण्यात यावी नसता मानवी हक्क अभियानाच्या वतीने महाराष्ट्रभर तीव्र स्वरूपाची आंदोलने करण्यात येईल याची दखल घ्यावी. अशा मागणीचे निवेदन देण्यात आले यावेळी मानवी हक्क अभियानाचे मधुकर कांबळे, रमेश गवळी, बाबासाहेब थोरात, रमेश जाधव, सुनिल थोरात, कचरू कांबळे, बबन खंडागळे,सुधाकर कांबळे बंडू खंडागळे, मच्छिंद्र उपाडे, प्रकाश थोरात, राजेश थोरात, संदीप वाघमारे, अनिकेत वाघमारे, सुंदर भिसे, श्रीमंत कांबळे, गौतम लोखंडे, सुग्रीव थोरात,आकाश लोखंडे अक्षय थोरात, शंकर गायकवाड, दीपक गायकवाड, बालासाहेब थोरात, राजेभाऊ थोरात, अशोक थोरात, रोहिदास खंडागळे, सर्जेराव लोखंडे, दामोदर वाघमारे, यांची उपस्थिती होती.

# मोफत उच्च शिक्षणाच्या निर्णयामुळे मुलींची आणखी प्रगती होईल-डॉ.सारिकाताई क्षीरसागर

महायुती सरकारचे मानले आभार

बीड (प्रतिनिधी)

'मुलगी शिकली, प्रगती झाली' हे मुलींनी सर्वच क्षेत्रात गरुडझेप घेऊन सिध्द करून दाखवले आहे. अशात आता मुलींना आणखी बळ देण्याच्या उद्देशाने महायुती सरकारने मोफत उच्च शिक्षणाचा निर्णय घेतला असून शैक्षणिक आणि परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के सवलतीचा लाभ मिळणार आहे. यामुळे मुलींची आणखी प्रगती होणार आहे. या निर्णयाचे सर्वस्तरातून स्वागत केले जात आहे. कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी महायुती सरकारचे आभार मानले आहेत.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग तसेच इतर मागासवर्ग प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्कात १०० टक्के प्रतिपूर्ती देण्याचा म्हणजेच शिक्षण पूर्णपणे मोफत देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला होता. यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील मुलींचं उच्चशिक्षणाचं स्वप्न पूर्ण होणार आहे. यापुढे जिजाऊ- सावित्रीच्या प्रत्येक लेकीला आकाशाला गवसणी घालण्यास महायुती सरकारचं बळ मिळणार आहे. या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, ना.अजितदादा पवार, कृषी मंत्री ना.धनंजय मुंडे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना.चंद्रकांतदादा पाटील, महिला व बालविकास मंत्री ना.आदितीताई तटकरे यांचे आभार मानले आहेत.



# बार्टीच्या संशोधक अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांविषयी दुजाभाव का?

## माजी मंत्री डॉ. नितीन राऊतांचा सवाल

मुंबई : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे (बार्टी) घेतलेल्या परीक्षेत अनुसूचित जाती प्रवर्गाचे ७६१ संशोधक विद्यार्थी पात्र ठरले. परंतु आजतागायत अधिछात्रवृती (फेलोशिप) मिळालेली नाही. त्याच वर्षी सारथी व महाज्योती अंतर्गत अनुक्रमे ८५१ व १२३६ विद्यार्थ्यांना फेलोशिप दिली गेली. फक्त बार्टीचे विद्यार्थी वंचित ठेवले गेले आहेत. बार्टीचे सर्व पात्र विद्यार्थी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येतात. गरिबीच्या परिस्थितीत संघर्ष करत शिकत आहेत. परंतु सरकारने केवळ त्यांच्याबाबत अक्षम्य दिरंगाई करत त्याचे शैक्षणिक नुकसान केले आहे. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांविषयी हा गंभीर स्वरुपाचा दुजाभाव का? असा प्रश्न आज सभागृहात उपस्थित करुन राज्याचे माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

पात्र विद्यार्थ्यांना फैलोशिप दिली जावी यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी पुणे येथील बार्टी कार्यालया पुढे वर्ष २०२३ मध्ये तब्बल ११० दिवस आंदोलन केले. फेबुवारी-मार्च २०२४ मध्ये मुंबईतील आझाद मैदान येथे ६० दिवस विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरु होते. तसेच २४ जून २०२४ ला पुणे येथील महात्मा फुले वाड़ा येथून या विद्यार्थ्यांनी मुंबई च्या दिशेने लॉन्ग मार्च ला सुरुवात केली. त्याच दिवशी या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाला सरकारने चर्चेसाठी बोलावून घेतले. त्यामुळे विद्यार्थ्यांना लॉन्ग मार्च स्थगित करावा लागला असल्याचे डॉ. राऊत यांनी सांगितले.राज्यात बार्टी, महाज्योती, सारथी, आणि अमृत अशा विविध संस्था कार्यरत आहेत. या सर्वच संस्थांमार्फत त्या-त्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रामुख्याने अधिछात्रवृत्ती, परदेशी उच्चशिक्षण शिष्यवृत्ती, एमपीएससी, यूपीएससी, बँकिंग, रेल्वे व इतर स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी प्रशिक्षण योजना राबवण्यात येतात. या संस्थांमध्ये सुसूत्रता आणण्याच्या नावावर एक समान धोरण निश्चित करण्याचा निर्णय राज्य शासनाने ऑक्टोबर २०२३ मध्ये घेतला. मात्र शासनाने बार्टीच्या अधिछात्रवृत्ती योजनांना कात्री लावून पुन्हा एकदा वंचित घटकांच्या जखमेवर मिठ चोळण्याचा प्रकार केल्याचा आरोप यावेळी डॉ. राऊत यांनी केला.२५ मार्च २०२४ रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत संदीप आखाडे, तुकाराम शिंदे, इषीकेश लबडे, तनुजा पंडित, सीमा वानखेडे, नमिता खरात, दीपक वास्के आणि प्रवीण गायकवाड या आठ विद्यार्थ्यांचे शिष्टमंडळ उपस्थित होते. सदर बैठकीत मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्येच्या मागण्या मान्य करून सुमंत भांगे यांना कार्यवाही करण्याचे आदेश दिले. भांगे यांना शिष्टमंडळ भेटले असता त्यांनी मागणी मान्य करत संबंधित संस्थेस कार्यवाहीचे आदेश दिले परंतु त्यानंतरही प्रत्यक्षात काही निर्णय झाल्याचे अद्याप ही दिसत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनाचा खर्च भागवणे अवघड आहे. फेलोशिप मिळत नसल्याने काही विद्यार्थ्यांवर हॉटेलमध्ये काम करण्याची वेळ आली आहे. सरकारने यावर तत्काळ निर्णय घेऊन विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी यावेळी डॉ. राऊत यांनी केली.






# बालविवाह निर्मूलन जनजागृती
## चर्चासत्रास प्रतिसाद

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

कै.दे.बा.गणगे यो.नूतन (रुग्णालय परिसर) विद्यालयात बालविवाह निर्मूलन जनजागृती मोहीमेअंतर्गत युनिसेफ,एसबीसी तीन जिल्हा प्रशासन व मनस्विनी महिला विकास सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी बालविवाह निर्मूलन जनजागृती चर्चासत्र संपन्न झाले यावेळी मुख्याध्यापक के.बी. नांदगांवकर, विभाग प्रमुख श्रीनिवास वैद्य , मार्गदर्शिका प्रणिता देशपांडे, हर्षाली जोंधळे आदी उपस्थित होते. यावेळी सहावी,सातवीचे विद्यार्थी चर्चासत्रात सहभागी झाले होते चर्चा सत्रास मोठा प्रतिसाद मिळाला कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहशिक्षिका पल्लवी गंगणे यांनी केले. यावेळी शिक्षक,पालक उपस्थित होते.



बीड - जिल्हा परिषद सदस्य अशोक लोढा यांचे चिरंजीव ऍडव्होकेट धनराज लोढा यांच्या विवाह प्रसंगी शुभेच्छा देताना फहीम इनामदार, पोलिस बॉईज असोसिएशन चे अध्यक्ष रविंद्र शिनगारे.


# सन फार्मा कंपनीकडून शेडाळा येथील आश्रम शाळेत सौलर सिस्टिम प्रदान

**आष्टी ।प्रतिनिधी**

**तालुक्यातील शेडळा ता आष्टी येथील शेडळा आश्रम शाळेत अहमदनगर येथील सन फार्मा कंपनीच्या सीएसआर फंडातून शासकीय आश्रमशाळा येथे सोलर सिस्टीमार्फत सुविधा पुरविण्यात आले असून शाळेमध्ये आता लाईटचा लखलखकाट पाहायला मिळत आहे**

सदर कंपनीच सीएसआर फंडातून दहा हॉट मिक्स लाइट बसवण्यात आल्या असून मुला-मुलींसाठी असलेले शौचालय त्यामध्ये सोलर सिस्टिम बसवण्यात आली आहे व मुला मुलींसाठी वेगवेगळे वॉटर हिटर अंघोळीसाठी ही बसवण्यात आले आहेत तसेच शाळेचे पूर्ण लाईट व्यवस्था सोलर मार्फत करण्यात आली असून सामाजिक वनीकरण मार्फत सन २०२३ /२०२४ या वर्षामध्ये २०००० वर्षाची लागवड ही करण्यात आली सदर वृक्षांना कुंपण व ठिंबक पाण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे तसेच २०२४ या वर्षी ३० हजार वर्षाची लागवड करण्याचा मानस शेडाळा

येथील आश्रम शाळेचे असल्याचे मत शाळेचे मुख्याध्यापक पालवे यांनी व्यक्त केले तसेच सन फार्म कंपनीने दिलेल्या सुविधा विषयी त्यांनी कंपनीचे आभार मानले आहे



# बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याची जनजागृती

आज दिनांक १० जुलै २०२४ रोजी सकाळी ०९:०० वाजता किमान समान कार्यक्रमाअंतर्गत न्या.आनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ या विषयी सेंट ॲन्स स्कूल, जालना रोड, बीड येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी न्या. जी.जी . सोनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अशोक तांगडे ,तत्त्वशील कांबळे ,शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर रोशमीन , मिथुन जोगदंड आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमात बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ या विषयावर बोलताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या .जी. जी. सोनी यांनी उपस्थीत विद्यार्थ्यांना या कायदयाविषयी माहिती सांगितली बालकांनी आपल्यासोबत अथवा आपल्या मित्र मैत्रिणींसोबत अशी घटना घडल्यास अशा प्रसंगी घाबरून किंवा गोंधळून न जाता आपल्या विश्वासातील व्यक्तीला, पालकांना, शिक्षकांना सांगावे व अशा घटनांपासून सावध रहावे असे मार्गदर्शनपर बोलताना सांगितले.



या कार्यक्रमाची प्रस्थावना सेंट ॲन्स स्कूलच्या मुख्याध्यापिका सिस्टर रोस्मीन यांनी केली व या कार्यक्रमाचे महत्व विद्यार्थ्यांना विषद केले. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना अध्यक्ष बालकल्याण समिती, बीड अशोक तांगडे यांनी गूड टच आणि बॅड टच यासंबंधीत माहिती बालकांना समजेल अशा सोप्या भाषेत सांगितली जसे की, आई, वडील ,आजी, आजोबा, बहिण, भाऊ, डॉक्टर ,शिक्षक यांनी काळजीपोटी केलेला टच गूड टच असतो. तर जो स्पर्श तुम्हाला आवडत नाही. ज्या स्पर्शामुळे तुम्ही घाबरून जाता, गोंधळून जाता, तुम्हाला वाईट वाटते असा प्रत्येक स्पर्श हा बॅड टच असतो. कधी कधी खूप जवळचा व्यक्ती सुध्दा असा बॅड टच करू शकतो. असा टच झाल्याबरोबर बालकाने त्या व्यक्तीपासून दूर जावे व घडलेली बॅड टचची घटना आई वडिल शिक्षक किंवा विश्वासातील जवळच्या माणसाला सांगावी, असे अवाहन बालकल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना तत्वशील कांबळे म्हणाले की बालविवाह बालमजुरी ,बाल लैंगिक शोषण,भिक्षा मागणारी बालके अशा सर्व समस्येची बालके आपल्याला आढळतात या सर्व बालकांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी व कायद्याचे सजग नागरिक निर्माण करण्याचे कार्य विधी सेवा प्राधीकरणाच्या वतीने केले जाते. आपले राष्ट्र जर कायद्याने सजग झाले तर कायदा पाळणारांची संख्या वाढेल व गुन्हेगारांचे प्रमाण कमी होईल. हाच उद्देश घेऊन विधी सेवा प्राधिकरण कार्य करीत आहे. कोणत्याही बालकाला अडचणीच्या वेळी मदत हवी असेल तर मुलांनी १०९८ यां क्रमांकावर फोन करून कळवावे असे आवाहन विधीदूत तत्वशील कांबळे यांनी केले.

# जातेगाव येथे शेतकऱ्याच्या शेतातून कडबा चोरी

## पोलिसांनी केली तक्रार घेण्यास टाळाटाळ

याप्रकरणी पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्याकडे केली शेतकऱ्याने तक्रार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील जातेगाव येथील एका शेतकऱ्याने ठोक्यांने केलेल्या शेतातून गावातीलच लोकांनी शेतात लावलेला कडबा चोरून नेला आहे. ही चोरीची घटना दि.११-०५-२०२४ रोजी घडली होती. याप्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात फिर्याद घेण्यास टाळाटाळ करत बीटचे जमादार खाडे यांनी फिर्याद न घेता बाहेरच्या बाहेर मिटवू म्हणून फिर्याद देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याला सांगितले.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील जातेगाव येथील नारायण विठोबा चव्हाण यांनी वैजीनाथ संतराम पाचंग्रे यांची सर्व्हे नंबर २२४ मधील ८० आर जमीन तीन वर्षांकरिता ठोक्यांने केली आहे. त्यामध्ये गेल्या वर्षी ज्वारीची पेरणी केली होती. तर ती ज्वारी काढून तो कडबा शेतात लावला होता. त्यावेळी शेतकरी नारायण चव्हाण यांचे हरण्याचे ऑपरेशन झाले होते. आणि ते १५ दिवस दवाखान्यात डमिट होते. तर या दरम्यानच्या काळात गावातील जहांगीरदार चव्हाण व बाबासाहेब चव्हाण यांनी चोरून नेला, त्यांना याबाबत विचारणा केली असता, त्यांनी अरेरावीची भाषा वापरुन जिवे मारण्याची धमकी दिली असल्याचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना दि.०९-जुलै-२०२४ रोजी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

तसेच दि.११-०५-२०२४ रोजी कडबा चोरी गेला प्रकरणी तलवाडा पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याला जातेगाव बीटचे जमादार खाडे हे फिर्याद देऊ नका, बाहेरच्या बाहेर मिटवून तुमचा कडबा परत करतो असे सांगून, याकडे दुर्लक्ष करून जाणीवपूर्वक टाळाटाळ केली आहे. याबाबत अनेक वेळा शेतकऱ्यानी विचारणा करून फिर्याद न घेतल्याने त्यांना नाराजी बाबत त्यांनी स्पष्ट सांगितले की, तु माझे पाहुणे पालवे पोलीस यांना तीन हजार च्या लाच मध्ये पकडून दिले. तसेच तुमच्या गावातून माझे पाहुणे बांगर यांना पण लाच घेताना पकडून दिले. यामुळे मी कोणतेही काम करणार नाही व काम करूनही देणार नाही. असे सांगून पोलीस स्टेशन बाहेर हाकलून दिले असे नारायण चव्हाण यांनी जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

# चि.सौ.का.ऐश्वर्या आणि चि.आकाश यांचा शुभविवाह थाटात संपन्न

बीड ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडीत भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य आण्णासाहेब थिटे यांची ज्येष्ठ कन्या चि.सौ.का. ऐश्वर्या आणि डॉ.कैलास वाघ रा.शेकटा जि.छत्रपती संभाजीनगर यांचे ज्येष्ठ चि.आकाश यांचा शुभविवाह मंगळवारी मोठ्या थाटात संपन्न झाला.


समर्थ मंगल कार्यालय नगर रोड बीड येथे मंगळवार दि.०९ जुलै रोजी दुपारी चि.सौ.का.ऐश्वर्या आणि चि.आकाश यांचा शुभविवाह मोठ्या थाटात संपन्न झाला. यावेळी वधु-वरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी ह.भ.प. राम महाराज शास्त्री वराट एकलिंगेश्वर संस्थान पाडळसिंगी, ह.भ.प. नामदेव महाराज माजी मंत्री प्रा.सुरेश नवले, माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, उपशिक्षणाधिकारी मोहनराव काकडे, पुण्याचे उपायुक्त शिवाजी शेळके, राजेंद्र मस्के, राजेश खटावकर, जि.प.सदस्य शिवाजी पवार, प्रकाश कवठेकर, गणपत डोईफोडे, पो.नि.संतोष साबळे, विलास बडगे, नितीन धांडे, विलास औताडे, भास्कर पाटील, कैलास उकांडे, कृष्णा पाटील, अशोक शिंदे, हेमंत क्षीरसागर, बाबूराव नन्नवरे, सुधाकर मिसाळ, किशोर पिंगळे, नारायण परजणे, शुभम धूत, अर्जुन बहीरवाळ, भरत खरमाटे, प्रकाश देसारडा, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, कार्यवाहक एम.ए.राऊत, सुनिल पांगारकर, प्राचार्य केशव भांगे, एस.टी. तांदळे, वसंत काटे, अंगद दहीफळे, राजेंद्र कुर्हे, अभिषेक राऊत, विश्वनाथ सपकाळ, इंजि.कृष्णा पानसंबळ, विष्णू जोगदंड, गणेश परदेशी, प्रदिप जगताप, पाडळसिंगीचे सरपंच रितेश साबळे, उपसरपंच विकास चौधरी, मुख्याध्यापक आप्पासाहेब येवले, पवळ पी.एस., सुरेश पेशकार, व्ही.आर. शिंदे, सतीश काटे, एस.एस.शिंदे, धनवंत मस्के, वाघमारे आर.आर., मातकर डी.बी., सस्तारे एस.व्ही., कसबे एम.एन., नागनाथ तेली, सुनिल शिंदे, बन्सोडे व्ही.बी. यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांसह महिला, पुरूषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या निवडी जाहीर

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जन्मोत्सव कमिटीच्या अध्यक्षपदी रुद्रा भैया कासार

**माजलगाव ।प्रतिनिधी**

**शहरात प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी साहित्यरत्न डॉ.आण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंतीचा सोहळा १ ऑगस्ट रोजी शहरात साजरा होणार आहे. शहरातील पंचशील नगर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्याकडून यावर्षीची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या अध्यक्षपदी पंचशील नगर येथील आर. के. कंपनीचे संस्थापक अध्यक्ष रुद्रा भैया कासार तर सचिवपदी गोटू लांडगे तर उपाध्यक्षपदी अमोल गावडे यांची सर्वानुमते ता. ६ रोजी झालेल्या पंचशील नगर येथे**



**दिपक आणा आलझेंडे, बाळू साळवे, अमोल आलझेंडे,आनंद साळवे, मच्छिंद्र कांबळे, अशोक साबळे, विशाल गणकवार, अतुल आलझेडे, धम्मा गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली. यावेळी सदरील निवडी सर्वानुमते जाहीर करण्यात आल्या.**

या वेळी पांडू अवचार, डेव्हिड टाकनखार, भरत भिसे, संजय सुतार, आकाश गालफाडे, करणं आलझेंडे, अमर भिसे, आकाश टाकनखार, राधे कासार, कुमार साळवे, मच्छिंद्र कासार, गोविंद फुलवरे, स्वप्नील टाकणखार, प्रितम साळवे, कृष्णा साळवे, रोहीत पौळ, जय सुतार, सुनिल आलझेंडे, विजय सुतार, लखन फुलवरे, अरबाज चाऊस, अशोक सकट, नितीन वैरागे, आकाश शिरसगर, सूरज कांबळे, बंटी डोंगरेसह पंचशीलनगर येथील नागरिक उपस्थित होते .

# पीएम किसान योजनेस धारूर तालुक्यात कुणी वालीच नाही!अनेक शेतकरी योजनेच्या लाभापासुन वंचित

धारूर ।प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी चालु केलेल्या पीएम किसान योजना नेमकी कोणत्या विभागा मार्फत चालवली जाते.हेच शेतकऱ्यांना माहित नसल्याने या योजनेस धारूर तालुक्यात कोणी वाली आहे की नाही. असा प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत. तरी जिल्हाधिकारी साहेब यांनी धारूर तालुक्यातील शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळवुन द्यावा. अशी मागणी या योजने पासुन वंचित असलेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे.

यासंदर्भात माहिती अशी की,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील शेतकऱ्यांसाठी पीएम किसान योजना चालु करून,या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दोन हजार रू महिना चालु केला होता.प्रारंभी कांही महिने ही योजना व्यवस्थित चालु होती.प्रथम ही योजना तलाठ्याच्या मार्फत चालु करण्यात आली होती. धारूर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना दोन तीन हप्ते मिळुन त्यांच्या लाभार्थींच्या बँक खात्यात पैसे जमा झाले.मात्र त्यानंतर अनेक कारणांनी लाभार्थी शेतकऱ्यांना येणारे पैसे बंद झाले.त्यामुळे लाभार्थी शेतकरी प्रथम तहसील कार्यालयात कशामुळे आमच्या खात्यात पीएम किसानचे पैसे येत नाहीत. असे म्हणत विचारना करत.तेव्हा त्यांना कांही कागदपत्रांची पुर्तता करण्याचे सांगण्यात आल्याने शेतकऱ्यांनी संबंधित कर्मचाऱ्याने सांगितलेल्या कागदपत्रांची पुर्तता करत सर्व दाखल केले.याच दरम्यान संबंधित योजना कृषी विभागास देण्यात आली.तेथे हंगामी कर्मचारी या योजनेचे काम पाहात होता.त्यातच त्या कर्मचाऱ्याचा कार्यकाल संपल्याने ही योजनेचे काम कांही ठप्प झाले.त्यातच लोकसभा निवडणुकीमुळे तर योजना रखडत पडली.ज्या शेतकऱ्यांनी पुर्वी लाभ घेतला. मात्र कांही कारणास्तव आता बंद पडल्याने कागदपत्रांची पुर्तता करून ही त्यांना पीएम किसानचा लाभ मिळत नाही.असे शेतकरी आपले पीएम किसान योजनेचे चालु करण्यासाठी तहसील कार्यालय व कृषी कार्यालयास चक्करा मारत आहेत. मात्र अद्याप पर्यंत कांहीच झाले.धारूर तालुका कृषी विभाग म्हणतो बीड वरिष्ठ कार्यालयास फाईल पाठवली आहे.आमच्याकडे कांहीच नाही.तर वरिष्ठ कार्यालय म्हणते तुमच्या तालुका कार्यालयास भेट.मग लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी जायचे कुणाकडे असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. त्यातच वारसा हक्काने योजनेत नाव लावण्यास ही दिरंगाई होत आहे.पीएम किसानसाठी नेमके शेतकऱ्यांनी जायचे कोणत्या कार्यालयास हे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

तरी मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी धारूर तालुक्यात पीएम किसान योजनेचा कार्यभार नेमका कोणत्या कार्यालयाकडे हे स्पष्ट करून ही योजना सुरळीत चालु करून लाभार्थी शेतकऱ्यांना लाभ मिळवुन द्यावा.अशी मागणी धारूर तालुक्यातील शेतकरीवर्ग करत आहेत.



साबलखेड ते आष्टी या रस्त्याचे काम एक वर्षापासून चालू असून हे काम दिम्या गतीने चालू आहे त्यातच नदीला पूर आल्याने कडा येथील लोकांना येजा करण्यासाठी टाकलेला भरावा वाहून गेल्याने लोकांचा संपर्क तुटला आहे तरी या पुलाचे काम त्वरित करण्यात यावी अशी मागणी आता ग्रामस्थांकडून होत आहे. छायाचित्र सुरेश कांबळे

## मराठा आरक्षणा साठी बीड येथे आयोजीत शांतता रॅलीसाठी धारुर मध्ये ऑटो रिक्षा युनीयनची जनजागृती फेरी उस्फुर्त प्रतीसाद

किल्लेधारूर ।प्रतिनिधी

मराठा आरक्षणा साठी बीड येथे११ जुलै रोजी आयोजीत शांतता रॅलीसाठी धारुर मध्ये ऑटो रिक्षा युनीयनच्या वतीने जनजागृती फेरी काढण्यात आली यांला उस्फुर्त प्रतीसाद मिळाला.मोठ्या संख्येने शांतता ररॅलीसाठी जाण्याचा निर्धार करण्यात आला. सकल मराठा समाज बांधवाचे वतीनै११जुलै रोजी बीड येथे मनोज जंरागे पाटील यांचे नेतृत्वा खाली शांतता रॅली काढण्यात येणार आहे या साठी धारूर शहरातील ऑटोरिक्षा युनीयन चे वतीने मुख्य रस्त्यावर व शहरात जनजागृती फेरीअध्यक्ष शाहूराव चव्हाण व उपाध्यक्ष सुरेश बप्पा शेळके यांचे नेतृत्वा खाली काढण्यात आली व मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा निर्धार करण्यात

## प्रधानमंत्री आवाज योजनेतील घरकुल घोटाळा तपास न लावल्यास संभाजी ब्रिगेड करणार आंदोलन

माजलगाव ।प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत माजलगाव तालुक्यातील प्रत्येक गावात घरकुल वाटप करण्यात आलेले असून, या घरकुल वाटपाचा उद्देश ज्या सामान्य नागरिकांना घरकुल नाही अश्या नागरिकांना डोक्यावर छत मिळावे या साठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही योजना काढली, सन २०२० पासून आज रोजी पर्यंत अनेकांना माजलगाव घरकुल वाटप झाले आहे. पण या घरकुल योजनेत गरीब बाजूला राहून दुसऱ्याने च फायदा घेतलेला निदर्शनास आले आहे. संभाजी ब्रिगेड ने प्रधान मंत्री अवस योजनेचा तपास व्हावा या साठी १४ जुलै २०२३ पासून गटविकास अधिकारी माजलगाव यांना निवेदन देऊन सुरुवात केली, त्यानंतर जिल्हाधिकारी बीड,आयुक्त कार्यालय संभाजी नगर ,तहसील माजलगाव,उपविभागीय कार्यालय माजलगाव सर्वच कार्यालय ला अनेक वेळा निवेदन दिले,पंचायत समिती माजलगाव कार्यालय ला सातत्याने अनेक वेळा निवेदन दिले असून तपास करण्या संधर्भात भूमिका घेतली नसून दिनांक ९ जुलै रोजी दिलेल्या निवेदनात संभाजी ब्रिगेड आंदोलनाचा इशारा दिला असून तपास न लावल्यास १८ जुलै रोजी पंचायत समिती समोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे संभाजी ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष विजय दराडे,माजलगाव तालुका अध्यक्ष तुकाराम ना,जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब सोळंके यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे

## नवयुवक तरुणांनी मतदान नोंदणी करून घ्यावी – मा.संदीप तांदळे

पाटोदा : नितिन भोंडवे

ज्या युवकांचे वय आठरा वर्ष पूर्ण झाले आहे आश्या तरुणाने आपले मतदान नोंदणी करून घ्यावी,जर आपले नाव मतदान यादीतून उघळले असेल किंवा १ जुलै २०२४ रोजी आपले वय आठरा वर्ष पूर्ण होत असेल तर, २५ जून ते २४ जुलै या कालावधीमध्ये आपले नाव नोंदणी करून घ्यावेत असे आव्हान युवा नेते मा.संदीप तांदळे यांनी केले आहे.



भारतीय लोकशाहीत मतदान हे सर्वश्रेष्ठ अधिकार आहे. ज्याचा वापर आपण आपला लोकप्रतिनिधी निवडून देण्यासाठी करत असतो.जेणे करून आपल्या गावाचा,शहराचा चांगल्या प्रकारे विकास व्हावा, विविध योजनांचा लाभ मिळावा, आणि उद्योग व्यवसायाची प्रकल्प आपल्या शहरात, गावात राबवण्यात यावे यासाठी लोकशाहीने दिलेले हे एक प्रबळ शस्त्र आहे. त्यासाठी विधानसभा निवडणूक पूर्वी सर्व तरुण तरुणीने आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदान नोंदणी करण्यासाठी जवळच्या महा-ई-सेवा केंद्राशी संपर्क करा.किंवा मोबाईल वर ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करून घ्यावी असे आव्हान युवा नेते संदीप तांदळे यांनी केले आहे.



झाडे लावा झाडे जागवा

सिरसमार्ग येथे बाजारस्थळ या ठिकाणी वड,पिंपळ,कणेरी,आज झाडे युवा नेते नागेशरडे यांच्या वतीने लावण्यात आले,सरपंच सुरेश मार्कड,उपसरपंच अनिलराव पवळ वृक्षप्रेमी ग्रामसेवक कुडके साहेब,नागेश रडे,अजीम पाठन संतोष पाबळे,अशोक परदेशी विजय उमाप,सुधाकर कारांडे,मोनू पवळ,ग्रामस्त उपस्थीत होते

## टाळ मृदंगाच्या गजरात बेलेश्वर संस्थान श्रीगुरु ईश्वरबाबा भारती पायी दिंडी चे पंढरपूर कडे प्रस्थान

### लिंबागणेश येथे जल्लोषात स्वागत:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मठाधिपती प.पु.महंत महादेव भारती व ह.भ.प.शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनात बेलगाव येथील श्रीगुरू ईश्वरबाबा भारती पायी दिंडी सोहळा श्रीक्षेत्र पंढरपूर कडे वारक-यांनी टाळ मृदंगाच्या गजरात तल्लीन होत ग्यानबा, तुकाराम गजर करत डोक्यावर तुळशीवृंदावन,हाती दिंड्या पताका घेतलेले वारकरी अशा भक्तिमय वातावरणात आषाढी वारीसाठी दिंडी रवाना झाली. बालाघाटावरील बेलेश्वर संस्थान प्रसिद्ध असुन पायी दिंडी सोहळ्याचे हे दुसरे वर्ष असुन त्याला प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणावर भाविक दिंडीत सहभागी झाले होते.दिंडीमध्ये जवळपास ७०० महिला पुरुष सहभागी झाले होते.आज दि.१० बुधवार रोजी सकाळीच १० वाजता बेलेवर संस्थान येथे दिंडी प्रस्थानावेळी पंचक्रोशीतील भाविक वारकरी जमा झाले होते.

आषाढी एकादशीला विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपुरला जाणा-या वारक-यांसाठी लिंबागणेश ग्रामस्थांच्या वतीने गेल्यावर्षी प्रमाणेच



ईश्वरभारती मंदिरात महाप्रसादाची सोय करण्यात आली होती.तत्पुर्वी गावच्या वेशीवर महंतांचे पुष्पहार घालून स्वागत रांगोळी,पायघड्या व सुवासीनींनी औक्षण करुन मंदिरापर्यंत सवाद्य मिरवणूक काढत त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव,उपसरपंच बाळकृष्ण थोरात, कल्याण वाणी , दामु थोरात,विक्रांत वाणी, विनायक मोरे, पांडुरंग वाणी,अनंत मुळे, बाजीराव दशमे,चोपदार धर्मा थोरात,अजिनाथ वाणी, बाबुराव वाणी, शिवहारी कोटुळे, हरिओम क्षीरसागर, डॉ.गणेश ढवळे आदि उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या व गायराण धारकांच्या विविध मागण्यांसाठी वंचित आक्रमक

### मागण्या तात्काळ मार्गी लावा अन्यथा तिव्र अंदोलन करु : पप्पु गायकवाड

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात शेतकऱ्यांच्या व गायराण धारकांच्या विविध मागण्यांसाठी वंचित बहुजन आघाडी आक्रमक झाली असून उपविभागीय अधिकारी बीड यांना गेवराई तहसिलदार मार्फत निवेदन दिले असून निवेदनाद्वारे केलेल्या मागण्या तात्काळ मार्गी लावा अन्यथा अनोख्या पद्धतीने तिव्र स्वरूपाचे अंदोलन करु असा ईशारा वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड यांनी दिला.

तालुक्यातील हजारो शेतकरी गोदाकाठच्या परिसरातील आहेत. यावर्षी पाऊस देखील वेळेवर झालेला आहे. पाऊस-पाणी चांगला झाला असल्याने पेरणी केलेली पिके डौलात आहेत. परंतु शेतकरी बांधवांना वेळेवर खत मिळत नाही, रासायनिक खतांचा जानिवपूर्वक कृत्रिम तुटवडा निर्माण करुन कृषीसेवा केंद्रधारक रासायनिक खतांची ओरिजिनल जिएसटीचे बिल देत नसून चढ्यादराने विक्री करत आहेत, कृषी अधिकारी कार्यालया मार्फत खताचे वाटप झाले नाही. गरीब अल्पभूधारक शेतकरी आज देखील रासायनिक खताच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांना तात्काळ रासायनिक खताचे वाटप करण्यात यावे. तसेच कृषी कार्यालया मार्फत पोखरा योजनेची योग्य पध्दतीने अंमलबजावणी होत नाही, ती व्यवस्थितपणे सुरळीत करण्यात यावी.

पोखरा योजने अंतर्गत खरेदी केलेल्या शेती औजारांचे दोन वर्षांपासून शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नाही ते अनुदान तात्काळ शेतकऱ्यांना वितरीत करण्यात यावे. गायराण जमीन धारकांना दिलेल्या नोटीस रद्द करून पेरलेल्या पिकांचे नुकसान करु नये, पेरलेले ते पिक त्या गायराण धारकाला घेवु द्यावे. तसेच तालुक्यातील पंधरा दिवसांपूर्वी चकलांबा येथे शेतात काम करत असतांना ३ शेतमजूर महिलांचा तर मालेगाव येथे शेतात गेलेल्या १७ वर्षीय युवकाचा विज पडून मृत्यु झाला होता त्या मृतांच्या कुटुंबाला तात्काळ अर्थीक मदत द्यावी व ज्यांचे पशुधन अवकाळी पावसाने व विज पडल्याने दगावली आहेत त्यांना तात्काळ अर्थीक मदत करावी.



शेतकऱ्यांना २०२० चा व दोन वर्षांपूर्वीचा विविध पिकांचा विमा आज पर्यंत मिळालेला नाही तो तात्काळ वाटप कराव तसेच पिक विम्याची खात्यात जमा झालेली रक्कम पिक कर्जात अनेक बँका वसूल करतात ती वसूल करू नये, तसेच सिविल स्कोरची अट न घालता पिक कर्ज वितरीत करण्याच्या सुचना गेवराई तालुक्यातील सर्व राष्ट्रीयीकृत व जिल्हा मध्यवर्ती बँकांना देण्यात याव्यात.

राज्य सरकारने पीएम किसान सन्मान योजनेचे धर्तीवर नमो शेतकरी योजनेची घोषणा केली, मात्र अद्याप दोन हजार रुपये अनुदान शेतकऱ्यांना अद्याप मिळाले नाही ते लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात वितरीत करण्यात यावे, त्याचबरोबर पंचायत समिती मार्फत राबवली जाणारी मनरेगा योजणा गेवराई तालुक्यातील पूर्णपणे बंद आहे ती तात्काळ सुरु करण्यात यावी. पावसाळ्याचे दिवस असताना शेतकऱ्याचा वेळ वाया चालला आहे, जसे की मोहगुणी लागवड, बांबू लागवड, शेवगा लागवड, गाय गोठा अशा विविध शेतकऱ्यांच्या मनरेगा योजना मार्फतच्या योजना बंद आहेत. त्यामुळे शेतकरी बांधवांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने शेतकरी बांधवांना अत्यंत मदतीची गरज असतांना कोणत्याही प्रकारचे प्रोत्साहन मिळत नाही तरी शासनाने तात्काळ मनरेगाच्या योजना सुरु कराव्यात. सर्व शेतकरी बांधवांच्या मागण्या तात्काळ मान्य करुन मार्गी लावाव्यात. अन्यथा शेतकऱ्यांच्या व गायराण धारकांच्या मागण्या मान्य न करुन त्या तात्काळ मार्गी लावल्या नाहीत तर वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने शेतकरी व गायराण धारकांना सोबत घेऊन पंधरा दिवसा नंतर गेवराई तहसिल कार्यालया समोर अनोख्या पद्धतीने तिव्र स्वरूपाचे अंदोलन करु असा ईशारा गेवराई तहसिलदार मार्फत उपविभागीय अधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

यावेळी किशोर भोले, रेवन गायकवाड, ज्ञानेश्वर हवाले, किशोर चव्हाण, दस्तगीर शेख,अनिल बोराडे, सचिन कांडेकर,संदिप रोकडे, अनिल पंडित, कृष्णा खेडकर, आनिल साळवे, राहुल सोनवणे, सुदाम मोरे, कृष्णा हातागळे, विनोद थोरात, दिलीप सूर्यवंशी, बबन फुलझळके, बाबासाहेब गंगाधर,सुभाष बांगर, बबन जाधव, जयराम सदाफुले,आप्पासाहेब मस्के, अमोल मस्के, संतोष कसबे तसेच तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पीक कर्ज वसुलीसाठी शेतकऱ्यांच्या बचत खात्यावर लावलेले होल्ड तात्काळ काढा– राहुल चाळक

### छावा क्रांतिवीर सेना

गेवराई/प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी शेतीसाठी राष्ट्रीयकृत बँकेकडून घेतलेले पिक कर्ज थकीत रक्कम वसुलीसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा गेवराई शाखेकडून शेतकऱ्यांना सक्ती केली जात असून बँकतील शेतकऱ्यांच्या सेव्हींग खात्यांना होल्ड लावले आहे. बँकेकडून होत असलेल्या या अडवणूकीमुळे शेतकऱ्यांना बँकेच्या खात्यावरुन व्यवहार करण्यासाठी अडचणी येत आहे. बँकेच्या अडवणूकीच्या धोरणामुळे ऐन खरीप हंगामाची तयारी करीत असतांनाच शेतकऱ्यांचे व्यवहार ठप्प पडल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

याबाबत माहीती अशी की, तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी शेतीसाठी राष्ट्रीयकृत बँकेतून पिक कर्ज घेतलेले आहे. गेल्या काही वर्षापासून तालुक्यात अतिवृष्टी व अत्यल्प पावसामुळे दुष्काळ पडल्याने तालुक्यातील शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक संकटात सापडलेले आहेत. अशा बिकट परिस्थितीत बँकेकडून शेतकऱ्यांना ऐन खरीप हंगामाची लागवड कशी करावी या विवंचनेत असलेल्या शेतकऱ्यांना बँकेकडून पिककर्जाची थकीत रक्कम भरण्याची सक्ती केली जात असल्याचा प्रकार समोर येत आहे. शेतकऱ्यांनी पिककर्जाची थकीत रक्कम भरावी यासाठी बँकच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांचे बॅकेत असलेले खाते होल्ड करुन शेतकऱ्यांची अडवणूक केली जात आहे. गेल्या वर्षी तालुक्यात अल्प पावसामुळे दुष्काळाची परिस्थिती होती. दुष्काळाची परिस्थिती असल्याने पाठपुरावा करुन शासनाकडून तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर करुन घेतली होती. दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर झाल्याने तालुक्यात विविध सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. यात शेतकऱ्यांच्या घेतलेल्या पिककर्जाच्या वसुलीला स्थगिती देऊन शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुर्नगठन करावे असे आदेश दिलेले आहेत. शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत स्टेट बँकेचे अधिकारी मात्र पिक कर्जाची वसुली करण्यासाठी शेतकऱ्यांकडे तगादा लावत आहे. बँकेने अनेक शेतकऱ्यांचे खाते विनासुचना अचानक होल्डवर ठेवले आहे. बँकेच्या या शेतकरी विरोधी धोरणाचा फटका अनेकांना बसला आहे. याबाबत बँकत चौकशी करणाऱ्या शेतकऱ्यांना पिक कर्जाची थकीत रक्कम भरल्याशिवाय खाते अनहोल्ड केले जाणार नाही असे उत्तर बँकेच्या अधिकाऱ्यांकडून दिले जात आहे. बँकेच्या या अडेलतट्टू धोरणामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचे सर्व व्यवहार ठप्प झाले असून बँकेच्या या कारभाराची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल चाळक व जिल्हासरचिटणीस मुक्ताराम मोटे यांनी तहसीलदार यांच्याकडे केली आहे व शेतकऱ्यांचे खाते अनहॉल्ड न केल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलनाचा इशारा यावेळी देण्यात आला आहे. यावेळी राहुल चाळक, मुक्ताराम मोटे, सह शेतकरी बांधव उपस्थित होते...!

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT